जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2025
लोकमत

# संख्याशास्त्र अधिविभागातील २४ विद्यार्थ्यांचे सेट परीक्षेत यश

कोल्हापूर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात आलेल्या राज्य पात्रता परीक्षा (सेट) - मॅथेमॅटिकल सायन्सेस या परीक्षेत शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र अधिविभागातील तब्बल २४ विद्यार्थ्यांनी पात्रता मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. गायत्री सुधीर सावंत, आकांक्षा उत्तम शेलार, अमृता बाबूराव पाटील, शैजल शहाजी मगदूम, पल्लवी आनंदा शेजवळ, सुशांत केदारी पाटील, गौरव केशव दळवी, वैष्णवी विश्वास जाधव, जागृती जितेंद्र कदम, प्रथमेश शिवानंद एकल, स्नेहल महादेव झरेकर, शुभम सुरेश कांबळे, ऋतुजा सुधाकर पांढरे, मोनिका अण्णासाहेब कांबळे, विशाल बापू झिटे, प्राची धनाजी खिलारे, स्नेहल विठ्ठल कचरे, वर्षाराणी रामदास साळुंखे, चंद्रदीप साताप्पा बरकळे, धनश्री सुरेश कांबळे, तुषार शिवाजी कांबळे, काजल महेबूब नदाफ, अभिजित नामदेव पवार आणि अमर हणमंत टिकोले यांनी या परीक्षेत यश मिळवले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2025
पुढारी

# विद्यापीठात १० रोजी शारदाबाई पवार अध्यासनातर्फे राज्यस्तरीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व सत्यशोधक प्रबोधन ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १० सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात प्राच्यविद्यामंडित कॅ. शरद पाटील यांचे स्त्रीदास्य व जातिदास्य विषयक चर्चाविश्व या विषयावर चर्चासत्र होणार आहे. चर्चासत्राचे उद्घाटन सरोज पाटील यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. डॉ. भारती पाटील, प्रतिमा परदेशी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 6 SEP 2025
पुढारी

# पीएच.डी. प्रवेश; ७ सप्टेंबरपर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता ७ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरण्याची ऑनलाईन सुविधा सुरू आहे. अर्जाची लिंक व माहिती पुस्तिका, प्रवेश सूचना व प्रवेश क्षमता https:/// www. unishivaji. ac. in/ admission/ PhD-Admission-2025-2026 या लिंकमध्ये उपलब्ध आहे, असे परिपत्रक उपकुलसचिव डॉ. विलास सोयम यांनी काढले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2025
तरुण भारत

# पीएच. डी. प्रवेश पूर्व परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पीएच. डी. प्रवेशपुर्व परीक्षा ९ आणि १० सप्टेंबरला घेतली जाणार आहे. विद्यार्थीहित लक्षात घेऊन या परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी ७ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.तरी विद्यार्थ्यांनी **https://www.unishivaji.ac.in.Admission/PhD-admission2025** या लिंकवर प्रवेश अर्ज भरावयाचा आहे, असे आवाहन उपकुलसचिव विलास सोयम यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 SEP 2025
सकाळ



देवाळे : येथे दत्तक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देताना मान्यवर.

# जीवनात यशसवी होण्यासाठी पंचसूत्रांचा अवलंब करा : डॉ. रणधीर शिंदे

**देवाळे :** ''जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी, मेहनत, प्रामाणिकपणा आणि निष्ठा या पंचसूत्रांसह वेळेचे योग्य नियोजन महत्त्वाचे आहे,'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी देवाळे (ता. पन्हाळा) येथे महारत्न फाउंडेशन आयोजित विद्यार्थी दत्तक कार्यक्रमात केले. यावेळी राज्य ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष भीमराव पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिंदे म्हणाले, ''सुसंस्कृत कुटुंब, प्रेरणादायी सहवास आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे यशाचा प्रवास सुलभ होतो. कार्यमग्न वृत्तीच यशाची गुरुकिल्ली आहे.'' भीमराव पाटील म्हणाले, ''संस्थापक भगवान पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी लावलेला हातभार आदर्शवत आहे.'' यावेळी मुख्याध्यापक एन. जी. नलवडे यांनी भगवान पाटील यांचा सत्कार केला. ग्रामीण साहित्यिक महादेव पाटील, रामभाऊ पाटील, मल्हार सेनाप्रमुख कृष्णा हिरवे उपस्थित होते. उपप्राचार्य समीर घोरपडे यांनी स्वागत केले. जी. एस. पाटील यांनी आभार मानले. ए. बी. पाटील व आर. डकरे यांनी सूत्रसंचालन केले.